# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ८**

**(सभावृत्तांत)**

दिनांक – ११/०५/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा गुरुवार,दिनांक ११/०५/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.गावडे–सहआयुक्त, मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दंडवते, मा.दुरगुडे,मा.इंदलकर, मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे,मा.थोरात, मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.भोसले,मा.पाटील, मा.घुबे,मा.रत्नपारखी-कार्यकारी अभियंता,मा.राजेश जाधव (पास विभाग प्रमुख, पीएमपीएमएल), मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्र.३३) प्रभाग क्र.२८ मध्ये MIDCF 2 ब्लॉक येथे अग्निशामन केंद्र उभारणेबाबत – मा.कैलास बारणे, मा.मोरेश्वर भोंडवे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.३४) चिखली गावातील मरीआई काळुबाई मंदीराशेजारील शाळेत पोलीस स्टेशन तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्याबाबत- मा.कुंदन गायकवाड, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.३५) श्री.पारधे स्वप्निल विजय, लिपिक यांचे अपील अर्जाबाबत– मा.मोरेश्वर भोंडवे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

----------

ठराव क्रमांक – ३३२ | विषय क्रमांक – १

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/६१/२०१७ दि.१५/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.३/८०/६८/२०१६-१७ अन्वये सेक्टर क्र. 10 व से.क्र.12 टाकी वरूनपाणीपुरवठा होणा-या भागात वितरण नलिका टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी मे.जय गणेश एंटरप्रायजेस निविदा रक्कम रू.४१,९२,१५९/- (अक्षरी र.रू.एकेचाळीस लाख ब्यान्नव हजार एकशे एकोणसाठ फक्त) पेक्षा ७.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४०,९३,६४३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्या बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३३ | विषय क्रमांक – २

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/१६५/२०१७ दि.१४/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस महापालिका सार्वत्रिक निवडणूक-2017 करीता व्हिडीयो चित्रीकरण करणेकामी अल्प मुदत ई नि.सु.क्र.73/2016-17 अन्वये लघुत्तम निविदाकार मे. राहुल फोटो व्हिडीओ काळेवाडी यांचे प्रति व्हिडीओ कॅमेरा, दोन कॅमेरामनसह,कॅमेरा शुटींग घेऊन कॅसेट स्वरुपात सीडीज पाहण्यासाठी 32 इंची TVसेट सर्व साधनांसह इ.प्रतिदिन र.रु.1258/- प्रतिदिन हे अंदाजपत्रकीय दर र.रु.2200/- पेक्षा लघुत्तम असल्यानेमा.आयुक्त सो. यांचेकडील दि.18/01/2017 रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. मे.राहुल फोटो व्हिडीओ काळेवाडी यांचेकडुन याकामी करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. तरी उपरोक्त प्रमाणे केलेल्या

कार्यवाहीस व मे.राहुल फोटो व्हिडीओ काळेवाडी यांनी सार्वत्रिक 2017 करिता केलेल्या व्हिडीओ चित्रीकरणचे प्रत्यक्ष कामकाजा प्रमाणे येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३४ विषय क्रमांक – ३

दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/६३/२०१७ दि.२३/३/२०१७

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ४१ स्मशानभूमी/दफनभूमीत ठेकेदारामार्फत काळजीवाहक पुरविणेचे कामकाजास मुदतवाढ देणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३५ विषय क्रमांक – ४

दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/१२१/२०१७ दि.३/४/२०१७

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ,ब,क,ड,इ,फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईकामी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था/बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था/मजूर सहकारी संस्था यांचेकडून खाजगीकरणाद्वारे किमान वेतन दराने उपलब्ध केलेल्या कामगारांचे कामास मुदतवाढ देणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय** – मा.इंदलकर साहेब, आपण ठेकेदारांच्या पी.एफ. कोडची तपासणी/व्हेरीफीकेशन पुढील आठवड्यापर्यंत पूर्ण करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३६ विषय क्रमांक – ५

दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./३/कावि/६७/२०१७ दि.३/३/२०१७

२) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./३/कावि/१६७/२०१७ दि.९/५/२०१०

विषय –पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३६ पैकी नजीकचे ०२ स्मशानभूमी/ दफनभूमीसाठी ठेकेदार पद्धतीने २४ तासासाठी ०७ काळजीवाहक प्रती दिन पुरविणेबाबत...

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये, मा.आयुक्त यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.५ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३७ विषय क्रमांक – ६

दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/९५४/२०१६ दि.२/१/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य विभागास आवश्यक ४.५ घन मिटर क्षमता बीन्स कंटेनर म.न.पा. ड्रॉईंग/डिझाईन/स्पेशिफिकेशन/नमुन्या प्रमाणे खरेदीकामी ऑनलाईन ई.निविदा सुचना क्र.१३/२०१६-१७ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन पाच निविदा दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.स्मितल इंजिनिअरींग वर्क्स, पुणे यांचे ४.५ घनमिटर क्षमता बीन्स कंटेनर एकूण-७५ नग (बाब क्र.१) साहित्यासाठी र.रु.३६,२४,७५०/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. मनपाचे आरोग्य विभागाकरीता ४.५ घनमिटर क्षमता बीन्स कंटेनर खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २४.४८% ने कमी असल्याने सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३८ विषय क्रमांक – ७

दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/९/२०१७ दि.११/१/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये होणार आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.८ डिसेंबर २०१६ चे पत्रान्वये मनपा हद्दीतील मतदारांची मतदानाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी यासाठी महापालिकेने सर्व प्रसार/प्रसिध्दी यंत्रणांचा अवलंब करून जनजागृती करणेबाबत कळविले आहे. तदनुसार महापालिकेने शहरामध्ये व गस्तीच्या ठिकाणी तसेच झोपडपट्टीमध्ये पथनाट्ये सादर करणे, फ्लेक्स व होर्डींग लावणे, महिला बचत गटांद्वारे मतदार जनजागृती करणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा घेणे, कामगारांचे मेळावे घेणे, ज्येष्ठ नागरिक संघ व घरकुल वासियांचे मेळावे घेणे, शहरातील गॅस वितरकाद्वारे मतदान करणेबाबतचे स्टिकर्स वितरीत करणे, मॅरेथॉन स्पर्धा व सायकल रॅली स्पर्धा आयोजित करणे, रिक्षास स्टिकर्स लावणे, रेडिओ मिर्ची, वृत्तपत्रे, सोशल मिडीया, ऑडीओ व्हिडीओ क्लिप यांच्यामार्फत प्रचार करणे इ. उपक्रम राबवून जनजागृती करणेबाबत मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने तातडीच्या होणा-या खर्चासाठी अंदाजे र.रु.८१,३६,५००/- (अक्षरी र.रू.एक्क्याऐंशी लाख छत्तीस हजार पाचशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**- मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी या विषयासंदर्भातील ऑडीट केल्यावर आक्षेपाचे जे काही मुद्दे निघत असतील, ते सगळे मुद्दे बील देण्याआधी पुढील स्थायी समितीच्या सभेमध्ये सांगावेत. मा.इंगळे साहेब, दक्षता विभाग म्हणून तुम्ही त्यांच्या त्या फाईलची तपासणी करावी. त्यांनी प्रत्यक्षात सांगितलेले रेट, त्यांनी केलेले कार्यक्रम, त्याचे व्हिडिओ, जे काही असेल ते सगळे चेक करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३३९ विषय क्रमांक – ८
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/१६६/२०१७ दि.१४/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता आवश्यक छपाई साहित्य खरेदीकामी ई निसुक्र. 43/2016-17 अन्वये लघुत्तम निविदाकार 1) मे जयगणेश ऑफसेट यांचे एकूण 54 बाबी र.रु.8,82,201/- २) मे आशिष एंटरप्रायजेस यांचे एकूण 50 बाबी र.रु.9,08,100 3) मे.गणराज प्रिंटर्स यांचे एकुण बाबी 60 साठी एकुण र.रु.9,29,025/- 4) मे.अमृत मुद्रणालय, यांचे एकुण बाबी 10 साठी एकुण र.रु.9,70,722/- असे एकुण 174 बाबी साठी एकुण र.रु.36,90,048/- (अक्षरी र.रु. छत्तीस लाख नव्वद हजार अठ्ठेचाळीस फक्त) चे खर्चास मा आयुक्त सो. यांनी दि 27/1/2017 अन्वये मान्यता दिलेली आहे. यानुसार सदर पुरवठाधारकाकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला आहे. सदर प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व र.रु.36,90,048/- च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४० विषय क्रमांक – ९
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/८३/२०१७ दि.१७/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६३/२/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र. ६१ दापोडी मुख्य रस्त्याचे कडेने पावसाळी गटरसाठी पाईपलाईन टाकणेकामी मे.श्रीकृपा एन्टरप्रायझेस नि.र.रू.35,01,400/- (अक्षरी रक्कम रुपये पस्तीस लाख एक हजार चारशे फक्त) पेक्षा 22.50% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.२८,४९,२६४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४१ विषय क्रमांक – १०
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग– औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/१/कावि/२१३/२०१७ दि.१३/४/२०१७

२) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/१/कावि/२५७/२०१७ दि.११/५/२०१७

विषय – प्रशिक्षणार्थिंना कौशल्य आधारित विशेष प्रशिक्षण देणेकरिता धोरण निश्चित करणेबाबत...

उपरोक्त अ.क्र.२ अन्वये, मा.आयुक्त यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.१० कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४२ विषय क्रमांक – ११

दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/३४६/२०१७ दि.२७/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे आरोग्य विभागास हॅंगींग लिटरबीन्स खरेदीकामी ई-नि.क्र.६०/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले आहेत. त्यामध्ये प्राप्त निविदाकारापैकी मे.इंद्रनिल टेक्नॉलॉजीस यांचे हॅंगींग लिटरबीन्स मनपा हद्दीत ५६२ ठिकाणी सिंमेट क्रॉक्रीटमध्ये बसवून पाच वर्ष देखभाल दुरूस्तीसह लघुत्तम दर सर्व करासह र.रू.२९,३००/- प्र.नग (जोड) प्राप्त झालेले आहेत. प्राप्त लघुत्तम दराने आरोग्य विभागास एकूण ५६२ नग स्टेनलेस स्टिल हॅंगींग लिटरबीन्स खरेदी कामी एकूण र.रू.१,६४,६६,६००/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकूण र.रू.१,७२,२६,४२४/- पेक्षा ४.४१% ने कमी असलेने त्यांचेबरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**–मा.अष्टिकर साहेब, यांनी दक्षता कमिटीकडून दर पृथक्करणाची एकदा तपासणी करावी. दुरुस्त दर निश्चिती करावे. त्यात एक टॅक्स डबल लावण्यात आलेला आहे. देखभाल दुरुस्तीसंदर्भात एकरकमी पैसे देणार आहोत. बीलाचे पैसे दिल्यानंतर त्यांनी काम केले नाहीतर काय करणार? म्हणून हे पैसे एकरकमी न देता टप्याटप्याने पाच वर्षांत द्यावेत. अथवा अटी-शर्तीत आवश्यक बदल करुन घ्यावा. गोळा होणारा कचरा कसा उचलणार, यासाठी काय यंत्रणा लावणार आहोत हे सांगावे आणि याचा सुद्धा त्यात अंतर्भाव करावा.

महिलांना महिला बालकल्याण विभागाकडून जी प्रशिक्षणे दिली जातात, त्यातील काही प्रशिक्षणांऐवजी ओला कचरा व सुका कचरा विलगीकरण प्रशिक्षण देवून या प्रक्रियेत शहरातील बचत गटांना अंतर्भूत करुन घ्यावे. शहराला व संपूर्ण देशाला कच-याचा जीवंत प्रश्न भेडसावतो आहे. या बचत गटांतील महिलांना कच-याचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करणे व डोअर स्टेपला कचरा विलगीकरण करण्याचे प्रशिक्षण द्यावे. महिला बालकल्याण विभागाकडून तसे प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४३ विषय क्रमांक – १२
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/इमु/कावि/१८९/२०१७ दि.२९/४/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ३) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४४ विषय क्रमांक – १३
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/३३/२०१७ दि.२९/४/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते ६) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४५ विषय क्रमांक – १४
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग–ब क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षे/लेखा/९/कावि/४५/२०१७ दि.२७/४/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.3/3/2016-17 अन्वये (सन २०१६-२०१७ साठी) प्रभाग क्र.२२ मध्ये वाचनालय बेंचेस मुतारी पुरविणेकामी मे.एल एन एंटरप्रायजेस नि.र.रु.7,92,657/- (अक्षरी र.रु सात लाख ब्यान्नव हजार सहाशे सत्तावन्न फक्त) पेक्षा -20.00% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४६ | विषय क्रमांक – १५
दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.राजू मिसाळ | अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/३३/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१३/०३/२०१७ ते दि.१९/०३/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा क्र.मुलेप/६/कावि/ ३३/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

**निर्णय-** स्थायी समितीने आदेश दिला होता की, सर्व विभागांनी त्यांच्या फाईल्स मुख्यलेखापरिक्षण विभागाकडे जमा कराव्यात. याकरिता दिलेली एक महिन्याची मुदत उद्या संपते आहे. हिशोबासाठी फाईल मुख्यलेखापरिक्षण विभागाकडे देणे गरजेचे आहे. स्थायी समितीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास पुढील सभेमध्ये दंड लावणेत येईल याची दक्षता सर्व विभागांनी घ्यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४७ | विषय क्रमांक – १६
दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/३४/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२०/०३/२०१७ ते दि.२६/०३/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा क्र.मुलेप/६/कावि/३४ /२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४८ | विषय क्रमांक – १७
दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/३५/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२७/०३/२०१७ ते दि.०२/०४/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा क्र.मुलेप/६/कावि/ ३५/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४९ | विषय क्रमांक – १८

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/२३/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०६/०३/२०१७ ते दि.१२/०३/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा क्र.मुलेप/६/कावि/२३ /२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५० | विषय क्रमांक – १९

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी | अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१७२/२०१७ दि.२८/४/२०१७

मा.वैद्यकीय अधिक्षक यंनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅंब्रो कंपनीची डायलिसीस मशीन (Sr.No.7589) च्या दुरूस्तीकामी आवश्यक पार्ट फिडींग पंप एकूण र.रु.४८,९७७/- (अक्षरी र.रु.अठ्ठेचाळीस हजार नऊशे सत्याहत्तर फक्त) हा Baxter India Pvt. Ltd. यांचे अधिकृत स्पेअर पार्ट वितरक M/S.VEE AAR TECH SOLUTION, New Delhi यांचेकडून निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५१ | विषय क्रमांक – २०

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.निर्मला कुटे | अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०४/कावि/१२४/१७ दि.२/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अपंग कल्याणकारी योजने अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील अर्ज सादर केलेल्या अंध, अपंग, मुकबधीर विद्यार्थी/नागरीकांना पी.एम.पी.एम.एल. मोफत बसपासेस पोटी एकूण र.रू.३,२५,६४,१८७/- (अक्षरी रक्कम रूपये तीन कोटी पंचवीस लाख चौसष्ठ हजार एकशे सत्याऐंशी फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**- प्रशासन विभाग आणि कामगार कल्याण विभाग या विभागांनी कर्मचारी फ्रि बसपास बाबत दक्षता घ्यावी. कर्मचारी फ्रि बसपासची सुविधा घेणा-या कर्मचा-यांना फ्रि बसपास किंवा ट्रान्सपोर्ट अलाऊंस या दोन्हीपैकी एकाच सुविधेचा लाभ घेता येईल. दोन्ही देता येणार

नाही. कामगार कल्याण विभागाने याची तपासणी करावी. याबाबत दोन महिन्यांनंतर विचारणा करणेत येईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५२ विषय क्रमांक – २१
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/५००/१७ दि.२८/४/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेचे कामांसाठी निविदेतील लघुत्तम ठेकेदार दीन महीला आधार रोज. संस्था यांना मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९०/- व भोसरी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४/- या दराने १ ट्रक वाहने दि.२६/१२/२०१६ अखेर उपलब्ध करुन देणेकामी कामाचे आदेश देण्यात आले आहे. १ ट्रक वाहने याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.१७६५९ दि.०४/१०/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सन्मा.सदस्य व आरोग्य निरिक्षक मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी प्रभाग क्र.५८,५९ व ६० मध्ये १ वाढीव ट्रक वाहनाची मागणी केलेली आहे. क क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात मोठया प्रमाणात कुंटुंब संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे मोठया सोसाटयांमधील कचरा गोळा करणेकामी वाढीव १ ट्रक लावून सध्या काही सोसाटयांमधील घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी वापरता येतील. म्हणुन दीन महीला आधार रोज. संस्था यांचेशी कचरा उचलणे व हलविणे या कामांसाठी दि.०५/१०/२०१६ रोजी प्रतिदिन १ ट्रक वाहने पुरविणेकामी करणेत आलेल्या करारनामा अट क्र.३४ नुसार मनपास कामासाठी जादा वाहनांची आवश्यकता असल्यास मा.सह आयुक्त यांच्या पुर्व परवानगीने मान्य दरामध्ये जादा टिपर वाहने उपलब्ध करुन घेण्याची अट आहे. त्यानुसार दीन महीला आधार रोज. संस्था यांचेकडून मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९०/- व भोसरी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४/- या दराने आणखी १ वाढीव ट्रक वाहने दि.२५/१२/२०१७ अखेर उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५३ विषय क्रमांक – २२
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१८०/२०१७ दि.२/५/२०१७

मा.वैद्यकीय अधिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या सेंट्रल गॅस प्लांट करिता आवश्यक कंट्रोल पॅनल ०१ नग खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्रं.०५/२०१६-१७ अन्वये (३ वेळा मुदतवाढ देऊन) दरपत्रके मागविणेत आले होते. त्यानुसार मे.पार्थ सेल्स कार्पोरेशन, भोसरी यांनी सादर केलेले र.रु.६८,५५०/- चे दरपत्रक हे लघुत्तम प्राप्त झालेले असुन अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा

३.९६% ने कमी असल्यामुळे स्विकृत करणेत आलेले असुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५४ विषय क्रमांक – २३
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – संगीत अकादमी
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.संअ/१/कावि/१६/२०१७ दि.३/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालीका माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत टाळगांव चिखली येथील श्री जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपिठाची स्थापना करणेबाबत मा.महानगरपालिका सभा ठराव क्र 684 दि.13/5/2015 अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर संतपिठाचा अभ्यासक्रम आराखडा, अभ्यासाची रचना, ईमारत स्ट्रक्चर, विद्यापिठात रहाणा-या निवासी विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था, वर्ग खोल्यांची रचना, साहित्याची माहिती, अध्यात्मीक शिक्षण कोठेही नाही किंवा सर्व संतांच्या वाग्:मय एकत्रीत रित्या कोठे शिकविले जाते, जे विद्यार्थी अभ्यासक्रम पुर्ण करतील त्याचे काय भविष्य काय असेल, इत्यादि बाबींचा अभ्यास दौरा आयोजित करणे आवश्यक आहे. या अंतर्गत १) पतांजली संस्कृत गुरूकुलम – हरिद्वार २) गुरूकुलम कांगडी – हरिद्वार ३) महेश योगी गुरूकुल – नोएडा दिल्ली ४) सुदांशु गुरूकुल – नांगलोई दिल्ली ५) संवीध गुरूकुल साध्वी रूतूंभरा वृंदावन ६) मायावती आग्रारोड – यमुना एक्सप्रेस वे ७) श्री श्री युनिव्हर्सीटी – ओडीसा ८) गोदी साही – कटक या प्रमाणे विद्यापीठांना भेटी देणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे मा. आमदार, मा. अति. आयुक्त यांचे सह एकूण १२ अभ्यासकांना पाठविणेस तसेच अभ्यासकांची संख्या कमी जास्त होवू शकेल सबब, सदर अभ्यासक्रम दौ-यासाठी येणा-या अपेक्षीत प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदरचा खर्च माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील चिखली टाळगांव येथे जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपिठ या लेखाशिर्षावर टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** अभ्यासदौ-यास जाणा-या १२ अभ्यासकांची नावे कळवावीत**.** मनपामार्फत अभ्यासदौरे आयोजित करणेस विरोध नाही. परंतू प्रत्येक अभ्यासदौ-यातून काय फलित निघाले याचा अहवाल मा.महापालिका सभेपुढे सादर करावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५५ विषय क्रमांक – २४
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भः- मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.वैद्य/४/कावि/५४२/२०१६ दि.४/५/२०१६

मा.वैद्यकीय अधिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

राज्य शासनाचे आदेशानुसार दरवर्षी प्रमाणे सन २०१६-१७ मध्ये पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २९ जानेवारी २०१७ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेचा व्यापक प्रचार व प्रसिध्दी करणेकामी वैद्यकिय विभागाकडील एन.यु.एच.एम.या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक पिंपरी

चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.६३,०००/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ठ हजार फक्त) अगाऊ काढुन खर्च करणेत आलेले खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५६ | विषय क्रमांक – २५

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकीय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/२५८/२०१७ दि.४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयातील एक्स-रे विभागातील डी.आर. सिस्टिम करीता तातडीने आवश्यक लागणा-या डी.आर.फिल्म खरेदीकामी M/s.Universal Traders यांनी ई-निविदेतील आयटेम क्र.१ ते ३ आयटेम करीता सादर केलेल्या लघुत्तम दरानुसार (DR X-Ray Film 8*10 cm चे 1 Box करीता र.रु.4,607/-, DR X-Ray Film 11*14 cm चे 1 Box करीता र.रु.8,939/- व DR X-Ray Film 14*17 cm चे 1 Box करीता र.रु.13,821/- दोन वर्षाकरीता खरेदी करण्यास व येणा-या एकूण र.रु.२६,०७,७७५/- (अक्षरी र.रू. सव्वीस लाख सात हजार सातशे पंचाहत्तर फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५७ | विषय क्रमांक – २६

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – माहिती तंत्रज्ञान

सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मा.तं.वि/१/कावि/१६५/१७ दि.४/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७, करीता एकुण ११ ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय कार्यान्वीत करण्यात आलेली होती. त्याकामी इंटरनेट सुविधा पुरविणेकामी मे. भारती एअरटेल प्रा.लि. यांचे प्राप्त दरानुसार र.रु.71,812/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५८ | विषय क्रमांक – २७

दिनांक – ११/०५/२०१७ | विभाग – माहिती तंत्रज्ञान

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी | अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जावक क्र.मा.तं.वि/९/कावि/१६३/२०१७ दि.४/५/२०१७

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा सार्वत्रिक निवडणूक 2017 चे निवडणूक कामकाजासाठी आवश्यक Hosting of Voters Search Application with Windows Server, IIS 9.0/Unlimited director structure and Unlimited Database with Unlimited Bandwidth वेब सर्व्हर प्रणाली तातडीचे बाब म्हणून मे. टेक

9 सर्व्हिसेस यांचे कडुन करारनामा न करता प्राप्त लघुत्तम दर र.रु.99,000/- (अक्षरी नव्यान्नव हजार फक्त) मध्ये खरेदी करुन कामकाज करुन घेतलेले खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५९ विषय क्रमांक – २८
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – करआकारणी व करसंकलन
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/०३/कावि/१८६/२०१७ दि.४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

करआकारणी व करसंकलन विभागा मार्फत मनपा हद्दीतील मिळकतकर विषयक विविध भारती (101 FM) व रेडीओ मिरची (98.3 FM) यांनी मिळकतकर वसुली विशेष मोहीमेअंतर्गत मिळकतकर भरणेसाठी व्यापक प्रसिद्धी होणेकामी दिनांक 20/3/17 ते 31/3/17 अखेर रेडिओ स्टेशनवर प्रसिद्धी केली आहे. त्याकामी विविध भारती (101 FM) यांचा एकूण र.रु.1,01,660/- इतका तर रेडीओ मिरची (98.3 FM) यांचा र.रु.1,42,416/- मधून र.रु.2,848/- आयकर वजा जाता निव्वळ देय र.रु. 1,39,568/- इतका खर्च झालेला आहे. सदरचा खर्च मिळकतकर वसुली खर्च या लेखाशीर्षांतील तरतुदीतून करणेत येईल. सदरील सर्व खर्च उपलब्ध कालावधी व कामाची तातडी विचारात घेता करारनामा न करता थेट पद्धतीने करणेत आलेला असल्याने सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६० विषय क्रमांक – २९
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/१५६/२०१७ दि.२६/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार ब व क क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करुन मोशी कचरा डेपो येथे वाहतुक करुन टाकणेकामी निविदा नोटिस क्र. ५/२०११-१२ देशपातळीवर प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आलेली होती. मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. यांची प्राप्त कमी दराची निविदा प्रतीटन र.रु. ७१४/- स्विकृत करुन मा. स्थायी समिती ठराव क्र. १५४९३ दिनांक २५/१०/२०११ व क्रमांक १६४२१ दिनांक २०/१२/२०११ अन्वये प्रथम वर्षासाठी प्रतीटन र.रु. ७१४/- व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी ५ % दर वाढीस मान्यता देणेत आलेनुसार पाचव्या (२०१६) वर्षासाठी प्रति मे. टन दर र.रु. ८६८/- दरवाढीस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार कामाचा आदेश क्र. आमु/३/कावि/०७/२०१२ दिनांक ०२/०१/२०१२ अन्वये देणेत आलेला आहे. त्यानुसार ब, क व इ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रायमरी व सेकंडरी कलेक्शन आणि अ, ड व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सेकंडरी कलेक्शनचे काम देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत दिनांक २/१/२०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्रं. १९४७९, दिनांक २३/१२/२०१६ अन्वये मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि. २७/०३/२०१७ रोजी करारनामा करुन कामाचे आदेश क्रं. आमुका/३/कावि/२८/२०१७, दिनांक ०१/०३/२०१७

अन्वये दि. ३/१/२०१७ ते दि. ३०/०४/२०१७ पर्यंत मंजूर दराने मुदतवाढ देण्यात आली होती. सदर कामाची मुदत दि. ३०/४/२०१७ रोजी संपुष्टात आली आहे. ०६ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रायमरी व सेकंडरी कलेक्शन कामासाठी निविदा नोटीस क्रं. १२ व १३/२०१६-१७ प्रसिध्द करणेत आली असून निविदेची कार्यवाही सुरु आहे. नविन निविदा कार्यवाही पुर्ण होणेस अंदाजे ४ महिने कालावधी लागणार आहे. दैंनदिंन कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणे हे अत्यावश्यक सेवेतील काम असल्याने मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार मागील दरामध्ये ५ टक्के वाढ करुन येणारा दर प्रस्तावात नमूद प्रमाणे मे. बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. यांना दि. १/५/२०१७ ते दि. ३१/८/२०१७ पर्यंत अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.४,५५,२३,०४०/- अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**–मा.आयुक्त साहेब यांच्या स्पष्टीकरणानंतर तीन महिने मुदतवाढ देऊन विषय मंजूर करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६१ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.उत्तम कैंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/१४८/२०१७ दि.०९/०३/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ०४ दिनांक २८/०४/२०१७ नुसार, औरंगाबाद महानगरपालिका आयोजित राज्यस्तर २०-२० क्रीकेट स्पर्धेस पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीकेट संघ पाठविणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे एकूण र.रु.७४,१००/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर हजार शंभर फक्त) चे खर्चास व सदर स्पर्धा अनुषंगाने रोख स्वरुपात करावयाचे खर्चासाठी श्री.रज्जाक पानसरे, क्रीडा अधिकारी यांच्या नावे आगाऊ र.रु.७४,१००/- मंजूर करणेस व सदरचा खर्च क्रीडा निधी, वार्षिक स्पर्धा, क्रीडा कला या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६२ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/२२९/२०१७ दि.१९/०४/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ०५ दिनांक २८/०४/२०१७ नुसार, आगामी जिल्हास्तर शालेय हॉकी स्पर्धा २०१७-१८ अनुषंगाने ४० विद्यार्थी खेळाडूंचे मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडीयम नेहरूनगर, पिंपरी १८ येथे दि.०१/०५/२०१७ ते २८/०५/२०१७ या काळात उन्हाळी हॉकी प्रशिक्षण शिबीर २०१७ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-

या र.रु.५६,३९८/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे व सदरचा खर्च, क्रीडा निधी, क्रीडा प्रशिक्षण शिबीर या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६३ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ११/०५/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव –

मा. क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ०६ दिनांक २८/०४/२०१७ नुसार, २८ वी किशोर-किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा २०१७ पुर्व प्रशिक्षण शिबीर, म.न.पा. क्रीडा प्रबोधिनी माध्य.विद्यालय, पिंपरी १८ येथे दिनांक १७ ते २३ मे २०१७ या काळात आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६९,८८३/- (अक्षरी र.रु.एकोणसत्तर हजार आठशे त्र्याऐंशी फक्त) चे खर्चास अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक – ३६४ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ११/०५/२०१७ विभाग – फ क्षेत्रीय स्थापत्य

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक–मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.कैलास बारणे, मा.मोरेश्वर भोंडवे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.२८ मध्ये MIDCF 2 ब्लॉक येथे अग्निशामन केंद्र उभारणे या कामाचा विकास शुल्क (Development Charges) अदायगीबाबत मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. तरी र.रु.१२,९८३/- इतकी रक्कम ऑनलाईन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६५ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ११/०५/२०१७

सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक– मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.कुंदन गायकवाड, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

चिखली मोरेवस्ती प्रभाग क्र.१ मधील चिखली शाळेतील वर्गामध्ये पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत निर्णय दिनांक २५/४/२०१७ च्या मा.पोलीस आयुक्त, आमदार भोसरी विधानसभा यांच्या भेटीदरम्यान झालेला आहे. सद्यस्थितीत मनपाच्या चालू असलेल्या आरक्षण क्र.१/९९ येथील शाळेच्या कामातुन सदरचे पोलीस स्टेशन सुरु करणेच्या कामास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६६ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ११/०५/२०१७

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक– मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.मोरेश्वर भोंडवे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

संदर्भ:- पारधे स्वप्नील विजय, लिपीक यांचा दि.०६/०५/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्रमांक ३५ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झाल्यानंतरचे सभेचेवेळी विषय क्रमांक ३५ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/३७/२०१७
दिनांक - १५/०५/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.